राज्यातील सीपीएस अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

शासन निर्णय क्रमांक सीपीएस ३८२०/प्र.क्र. ७०/२०/शिक्षण-२
वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग,
गो.ते. रूग्णालय नवीन इमारत,९ वा मजला, गो.ते. रूग्णालय संकुल,
नवीन मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई
दिनांक- २२ नोव्हेंबर, २०२१

संदर्भ -१) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांचे पत्र क्र. संवैशिवसं/१२२१/सीपीएस/प्रवेश प्रक्रिया/२१/२-अ, दिनांक १७/११/२०२१

२) शासन पत्र क्र.बैठक २१२१/प्र.क्र. २०४/२१/शिक्षण-२, दिनांक २९/१०/२०२१

३) आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांचे पत्र क्र वै.शि./प्र.क्र. ८९/सीपीएस प्रवेश प्रक्रिया/१५६९, दिनांक २२/०९/२०२१

४) प्रबंधक, कॉलेज ऑफ फिजीशियन्स अ‍ॅन्ड सर्जन्स, मुंबई CPS/Admin/१८६१/२०२१, दिनांक १७/०९/२०२१

५) आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार,नवी दिल्ली यांचे पत्र क्र. U-१२०२१/०५/२०२१-MEC/FTS-८१०६६२६,दिनांक २४/०५/२०२१

६) आरोग्य कुटूंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. V.११०२५/१४/२०१५-MEP(Pt), दिनांक ०५/०८/२०२०.

७) आरोग्य कुटूंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. V.११०२५/१४/२०१५-MEP(Pt), दिनांक ०५/१२/२०१९.

**प्रस्तावना** : केंद्रीय आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांचे संदर्भाधीन ५ ते ७ वरील पत्रान्वये कॉलेज ऑफ फिजीशियन्स अ‍ॅन्ड सर्जन्स ( सीपीएस), मुंबई यांचेमार्फत राबविण्यात येणारे वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे प्रवेश राज्य शासनामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. उक्त प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी कार्यपध्दती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय:** आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांच्या सूचनेस अनुसरुन कॉलेज ऑफ फिजिशियन्स आणि सर्जन्स (सीपीएस), मुंबई यांचेमार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्यातील मान्यताप्राप्त वैद्यकीय

पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे प्रवेशासाठी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासूनची प्रवेश प्रक्रिया ही राज्यशासनामार्फत राबविण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर प्रवेश प्रक्रिया राबविण्याकरिता पुढीलप्रमाणे कार्यपद्धती अवलंबिण्यात येईल:-

अ) सदर प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी आयुक्त, वैद्यकीय शिक्षण हे 'सक्षम प्राधिकारी' राहतील.

ब)प्रवेश प्रक्रिया पारदर्शक व सुरळीतपणे राबविण्याकरिता आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांचेमार्फत आवश्यक समिती गठित करता येईल.

क)सीपीएस अभ्यासक्रमांचे उक्त सर्व प्रवेश हे संबंधित शैक्षणिक वर्षासाठीच्या "नीट-पीजी" या अखिल भारतीय स्तरावरील प्रवेश परीक्षेच्या गुणवत्तेनुसार करण्यात येतील.

ड) सदर प्रवेश प्रक्रिया राबविण्याकरिता सीपीएस संस्थेकडून आवश्यक माहिती प्राप्त करून आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांच्याकडून प्रवेश प्रक्रियेची माहितीपुस्तिका (Brochure) तयार करण्यात येईल व त्यास शासनाची मान्यता घेण्यात येईल.

इ) प्रवेश प्रक्रियेच्या कामाकरिता आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांना विहित पद्धतीने उचित एजन्सीची निवड करता येईल.

३. सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत रुग्णालयामध्ये सुरू असलेल्या सीपीएस अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया ही पूर्वीप्रमाणेच त्या विभागामार्फत राबविण्यात येईल. उर्वरित शासकीय/निमशासकीय/ खाजगी संस्थांमधील सीपीएस अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया ही आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांच्यामार्फत राबविण्यात येईल.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे नावाने व आदेशानुसार,**

२२/११/२०२१

(अजित सासुलकर)
अवर सचिव

प्रत:

१.अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई.
३. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई
४. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
५. प्रबंधक, कॉलेज ऑफ फिजीशियन ॲन्ड सर्जन्स,परेल, मुंबई
६. अवर सचिव, आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली
७. निवडनस्ती ( सिक्षण-२ )